२९

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

ता. राहुरी, जि. अहमदनगर, पिन-४१३७२२

जा.क्र. मफुकृवि/लेखा शाखा-२/ ५४४ /२०१८ दिनांक : १९।०९।२०१८

परिपत्रक

**विषय-** राज्यातील केरळ राज्यात पावसामुळे उदभवलेल्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदत म्हणून राज्यातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहायता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देणे बावत...

**संदर्भ:-** शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण-१११/प्र.क्र.३७८/१६-अ दि.२७/८/२०१८

महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीच्या अधिनस्त कार्यरत सर्व अधिकारी , कर्मचारी यांना यापरिपत्रकान्वये कळविण्यात येते की, शासनाचे परिपत्रक क्रमांक शासन परिपत्रक क्रमांक:संकिर्ण-१११८/प्र.क्र.३७८/१६-अ दिनांक - २७.८.२०१८ अन्वये केरळ राज्यात उदभवलेल्या पावसामुळे नैसर्गिक आपत्तीग्रस्त नागरिकांना मदत म्हणून राज्यातील सर्व भा.प्र.से. भा.पो.से. भा.व.से व महाराष्ट्र राज्य राज्य शासनाचे सर्व अधिकारी / कर्मचारी यांच्या सप्टेंबर, २०१८ च्या वेतनातून एक दिवसाचे वेतन मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये देणगी म्हणून उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश दिले असून या परिपत्रकाद्वारे शासन परिपत्रकात नमूद केल्यानूसार कार्यवाही करण्याबाबत नमूद करण्यात येत आहे.

अधिदान व लेखा अधिकारी पुणे/धुळे/कोल्हापूर/राहुरी/अति. अधिदान व लेखा अधिकारी म.फु.कृ.वि, राहुरी यांनी आपल्या विभागातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांचेकडील वेतन देयकांमधून सर्व अधिकारी व कर्मचारी यांची एक दिवसाची वेतन कपात करुन कपात केलेल्या रकमांची नोंद घेण्यासाठी एक स्वतंत्र नोंदवही ठेवावी. त्यामध्ये कपात केलेल्या रकमांची नोंद कार्यालय निहाय घेण्यात यावी व ती रक्कम संदर्भीय शासन परिपत्रकातील मुददा क्र.चार मध्ये दर्शविल्याप्रमाणे मुख्यमंत्री सहाय्यता निधीत जमा करण्यात यावी व तसा हिशोब ठेवण्यात यावा.

एक दिवसाचे वेतन कपात करताना ते मूळ वेतन + ग्रेड पे + महागाई भत्ता यांच्या एकूण रकमेच्य आधारे गणना करुन कपात करण्यात यावे. तसेच शासन परिपत्रक ०४ (पाच) प्रमाणे प्रत्येक देणगीदारास प्रमाणपत्र द्यावे.

एक दिवसाच्या एकूण वेतनाइतक्या रक्कमेपेक्षा कमी रक्कम कापून घेण्यास परवानगी देण्यात येऊ नये. सदरची कपात सप्टेंबर, २०१८ च्या होणा-या वेतन देयकातून करण्यात यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत: शासन परिपत्रक दि. २७/८/२०१८

नियंत्रक
म.फु.कृ.वि., राहुरी

प्रत- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी समादराने अग्रेषित..

१. संचालक, कृषि शिक्षण/ संशोधन व विस्तार शिक्षण/ मफुकृवि, राहुरी
२. सहयोगी अधिष्ठाता (सर्व), विभाग प्रमुख (सर्व)
३. सहयोगी संशोधन संचालक (सर्व).
४. कुलसचिव / विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी.
५. विद्यापीठ ग्रंथपाल/ सुरक्षा अधिकारी/ विद्यार्थी कल्याण अधिकारी/विद्यापीठ अभियंता, मफुकृवि, राहुरी
६. प्राचार्य, सर्व कृषि तंत्र विद्यालये.
७. उप-कुलसचिव (प्रशासन/विद्या), सहा.नियंत्रक/सहा. कुलसचिव (सर्व)
८. शाखा प्रमुख/प्रभारी अधिकारी/योजना प्रमुख (सर्व)
९. अधिदान व लेखा अधिकारी पुणे/धुळे/कोल्हापूर/राहुरी/अ.अलेअ,म.फु.कृ.वि, राहुरी
१०. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालये (सर्व), कृषि तंत्र विद्यालय, मालेगाव
११. मा. कुलगुरु/कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक मफुकृवि, राहुरी